M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

क्र.मुंविमं/उमाप/ 2220
वाशी,नवीमुंबई ४००७०३
दिनांक :- २२.०७.२०२६

प्रति,

१. मा.महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,महाराष्ट्र शासन, मुंबई ३२
२. मा.विभागीय माहितीी व प्रसिध्दी उपसंचालक,मुबई विभाग
३. मा.संचालक,दुरदर्शन केंद्र,वरळी,मुबई ३०
४. मा.संचालक,आकाशवाणी,मुबई केंद्र,नविन प्रसारण भवन,मुंबई २०
५. जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,मुंबई व उपनगर,जिल्हा ठाणे,रायगड,पालघर जिल्हा
६. मा.संपादक,सर्व वृत्तपत्र/वृत्तवाहिन्या

विषय:- जुन/जुलै २०२६ मध्ये आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शाालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत..

संदर्भ :- राज्य मंडळाचे क्र.रा.मं./परीक्षा—२/३०४६/दिनांक २२.०७.२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

जुन/जुलै २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेच्या गुणपत्रक तथा प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबतच्या प्रकटनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर प्रकटनांस आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्र,वृत्तवाहिन्या,आकाशवाणी व दुरदर्शन केंद्रांनी त्याच्या वृत्तपत्रात/प्रादेशिक बातम्याचे वेळी विनामुल्ये प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी,ही विनंती.

आपली विश्वासू

(माधुरी पाटोळे)
विभागीय सहाय्यक सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी,नवी मुंबई ४०० ७०३

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

।। प्रकटन ।।

विषय : जून-जुलै २०२६ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेच्या एकत्रित गुणपत्रिका व प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र व इतर साहित्य वाटपाबाबत...

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत जून-जुलै २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर मंगळवार दिनांक १४ जुलै, २०२६ रोजी ऑनलाईन जाहीर करण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने जून-जुलै २०२६ मध्ये झालेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेचे गुणपत्रक तथा प्रमाणपत्र, स्थलांतर प्रमाणपत्र व तपशिलवार गुण दर्शविणारे शालेय अभिलेख यांचे वाटप संबंधीत विभागीय मंडळांमार्फत सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना गुरुवार दि.२३/०७/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार असून सर्व माध्यमिक शाळा /उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत त्याच दिवशी दुपारी ३.०० वाजता विद्यार्थ्यांना गुणपत्रक तथा प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय मंडळांमार्फत सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना सूचित करण्यात आलेले आहे.

यासंदर्भात विभागीय मंडळ कार्यकक्षेतील सर्व संबंधित प्राचार्य / विद्यार्थी व पालक यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.

दिनांक:- 22/०७/२०२६